CMYK

फार्मर आयडी शेतकऱ्यांची नवी ओळख - तहसीलदार निलेश मडके >> पान 2

बुलढाणा जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना गतीने पूर्ण करा >> पान 3

अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जलजीवन मिशनच्या चौकशीचे काम थंडबस्त्यात >> पान 4

**सुविचार**

सातत्याने कार्यरत राहिल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नसते.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'तुम्ही फिल्म इंडस्ट्रीला मारून टाकताय', संसदेत जया बच्चन भडकल्या

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 183 ■ गुरूवार, दि. 13 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# निवडणुकीदरम्यान मोफतच्या योजना जाहीर करणे चुकीचे : एससी

## लाडकी बहीण, आनंदाचा शिधा सारख्या योजनांनी कामाची इच्छा कमी झाली

**नवी दिल्ली : गेल्या काही वर्षांमध्ये राजकीय पक्ष निवडणुकांच्या तोंडावर नागरिकांसाठी विविध योजना जाहीर करत आहेत. ज्यामुळे मोफत लाभांच्या योजनांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अशात बुधवारी या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्र्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, अशा योजनांमुळे लोक काम करण्यापासून आणि देशाच्या विकासात सहभागी होण्यापासून परावृत्त होत आहेत. न्यायमूर्ती बीआर गवई म्हणाले, दुर्दैवाने, या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास तयार नाहीत. त्यांना मोफत रेशन मिळत आहे. त्यांना कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत.**

मध्य प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्र (लाडकी बहीण योजना) यासारख्या राज्यांमध्येही मासिक आर्थिक मदतीची अशीच आश्र्वासने देण्यात आली होती, ज्यामुळे त्या-त्या राज्यांच्या निवडणुकीत भाजपाच्या विजयात या योजनांनी मोठा वाटा उचलला होता.

दरम्यान न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर एका याचिकेवर सुनावणी सुरू होती. त्यावेळी न्यायमूर्ती बीआर गवई यांनी ही टिप्पणी केली. या याचिकेत शहरी भागातील बेघर लोकांना आश्रय देण्याची मागणी करण्यात आली होती.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, मोफत रेशनमुळे, निवडणुका जाहीर झाल्यावर लोक काम करण्यास तयार नसतात. त्यांना कोणतेही काम न करता मोफत रेशन मिळत आहे. माफ करा, पण या लोकांना मुख्य प्रवाहातील समाजाचा भाग न बनवून आपण परजीवींचा एक वर्ग निर्माण करत आहोत असे वाटत नाही का?

दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर काही दिवसांनी सर्वोच्च न्यायालयाने ही कठोर टिप्पणी केली आहे. दरम्यान दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपा आणि आप या दोन्ही पक्षांनी ते सत्तेत आल्यानंतर मोफत लाभाच्या विविध योजनांची घोषणा केली होती.

'आप'ने दिलेल्या आश्र्वासनांमध्ये महिला सन्मान योजना (प्रत्येक महिलेला मासिक २,१०० रुपये मदत), पाण्याचे बिल माफ करणे, विद्यार्थ्यांसाठी मोफत बस प्रवास आणि विद्यार्थ्यांसाठी मेट्रो भाड्यात ५०% सूट यांचा समावेश होता. दुसरीकडे भाजपाने महिलांना दरमहा २५०० रुपये मदत, दर होळी आणि दिवाळीला मोफत सिलिंडर देण्याचे आश्र्वासन दिले होते. दरम्यान ८ फेब्रुवारी रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये भारतीय जनता पार्टीने तब्बल २७ वर्षांनी पुन्हा एकदा दिल्ली विधानसभा निवडणुकीत सत्ता मिळवली आहे.



# 'लाडकी बहीण'चा ठिबक सिंचन योजनेला फटका

## कोट्यवधी रुपये सरकारकडे अडकले, शेतकरी हवालदिल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : लाडकी बहीण योजनेचा फटका अनेक योजनांना बसत असल्याचे दिसून येत आहे. आता या योजनेचा फटका शेतकऱ्यांनाही बसतोय का? असा प्रश्र्न उपस्थित होत आहे. कारण शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेसाठी दिलं जाणार अनुदान गेल्या वर्षभरापासून मिळालेलेच नाही. एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांची शासनाकडे पाच कोटी ६० लाख रुपये सरकारकडे बाकी आहे. शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन योजनेसाठी अनुदान मिळते, म्हणून या योजनेत सहभाग घेतला होता. शेतीत ठिबक योजनेसाठी स्वतःच्या खिशातून शेतकऱ्यांनी पैसे घातले. सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाचे पैसे मागण्यासाठी शेतकरी कृषी कार्यालयाचे उंबरठे झिजवतात. मात्र, त्यांना त्यांच्या हक्काचे सबसिडीचे पैसे मिळत नसल्याची स्थिती उद्भवली आहे.**

लाडकी बहीण योजनेचा इतर योजनांना फटका बसत असल्याने विरोधकांनी फडणवीस सरकारवर निशाणा साधलाय. लाडकी बहीण योजनेमुळे शिवभोजन सारख्या योजना बंद करायला लागल्याचा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी लगावलाय. तर लाडकी बहीण योजना बहिणींसाठी नाही तर सत्तेसाठी होती, असे म्हणत माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर हल्लाबोल केलाय. तर दुसरीकडे लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणाऱ्या महिलांच्या नावाच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रवेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

जयंत पाटील यांनी म्हटले आहे की, लाडकी बहीण योजनेतून ५ लाखाच्या आसपास महिलांची नावे कमी झाली आहेत. महिलांना एकदा पैसे दिले की दिले. त्या पैशावर महिलांनी मते देखील दिले. पण आता काही महिलांना या योजनेतून वगळत आहे हे सरकार चुकीचं करतेय. पैसे देताना सरकारने बघूनच पैसे द्यायला हवे होते. पैसे न बघता दिल्यावर आता पैसे थांबवता येणार नाहीत. त्यामुळे लाडक्या बहिनींना मिळणारे पैसे मिळालेच पाहिजे. त्यामुळे आम्ही लाडक्या बहिणींच्या बाजूने उभे आहोत. ज्या महिलांनी मतदान केलं त्या महिलांची आता फसवणूक झाली असं त्या महिलांना वाटू नये, असे म्हणत जयंत पाटील यांनी लाडकी बहीण योजनेवरून सरकारला टोला लगावलाय.



दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील महायुती सरकारने लाडका भाऊ योजनेच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत लाखाहून जास्त प्रशिक्षणार्थी राज्यातील विविध कार्यालयात नेमले होते. आता त्यांचे सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींना कामावरून कमी केले जात आहे. त्यामुळे राज्यातील सर्व प्रशिक्षणार्थींवर पुन्हा बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. त्यामुळे लाडक्या बहिणीसाठी लाडक्या भावाकडे दुर्लक्ष करू नका, असे आवाहन करण्यासाठी आज सांगलीत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी तरुणांचा राज्यव्यापी मेळावा पार पडतोय. या प्रशिक्षणार्थींना न्याय मिळावा या मागणीसाठी व आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी सांगलीत या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेय. श्री संत बागडेबाबा मानव मित्र संघटनेचे सर्वेसर्वा तथा महाराष्ट्र राज्य युवा प्रशिक्षणार्थी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रमुख हभप तुकाराम बाबा महाराज यांनी या मेळाव्यात पुढाकार घेतलाय.

## डाक जीवन विमा पुनर्जीवित करण्यासाठी विशेष मोहिम

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा योजना नागरिकांना विमा सुरक्षासाठी सुरु करण्यात आली आहे. परंतु काही विमाधारकांच्या विमा पॉलीसी नियमित हफ्ता न भरल्यामुळे बंद पडलेल्या आहेत. सदर बंद पडलेल्या विमा पॉलीसी पुनर्जीवित करण्याकरिता डाक संचालनालय, पोस्टल जीवन विमा, नवी दिल्ली यांचे आदेशानुसार दि. १ मार्च ते ३१ मे २०२५ या कालावधीमध्ये विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या कालावधी दरम्यान पुनर्जीवित करण्यात येणाऱ्या विमा पॉलीसीचे दंडावर काही प्रमाणात सूट देण्यात येणार आहे. या संधीचा नागरिकांनी लाभ घेण्यासाठी जवळच्या पोस्ट ऑफिस येथे संपर्क साधावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

## विविध मागण्यांसाठी सारशिव गावातील तरुणाचे उंच टॉवरवर चढून आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील सारशिव गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेभोवती मोठ्या प्रमाणात अवैध अतिक्रमण करण्यात आले आहे. ज्याचा शाळेतील विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतोय. या प्रमुख मागणीसह गावातील विविध समस्या संदर्भात अनेकदा पंचायत समितीकडे तक्रारी करण्यात आल्या. मात्र, अजूनही दखल घेतली जात नसल्याने संतप्त झालेल्या गावातील तरुणांनी तीनशे फूट उंच टावर वर चढून आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत खाली उतरणार नसल्याचा पवित्रा या आंदोलकांनी घेतला आहे.

## अजित पवारांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मुंबईला बोलावून घेतलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर बीड जिल्हा गेल्या काही दिवसांपासून अनेक मुद्द्यांनी चर्चेत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडचे पालकत्व स्वीकारल्यानंतर झालेल्या पहिल्याच डीपीडीसी बैठकीत मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळीत बोगस कामे करून ७३ कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला होता. याच अनुषंगाने मागील दोन वर्षांतील निधीच्या वितरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती. आता अजित पवार ॲक्शन मोडमध्ये आल्याचे पाहायला मिळत आहे. अजित पवारांनी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मुंबईला बोलावून घेतलं आहे.

बीड जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपात दुजाभाव झाला. निधी वाटपात गैरप्रकार झाल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. याबाबत पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नियोजन समितीची बैठक होताच जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची सर्वकष चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथक गठीत करण्यात आले आहे.

बीड जिल्हा नियोजन समिती बैठकीत तीन सदस्यीय चौकशी पथक समिती गठीत करण्यात आली असून मागील दोन वर्षांमध्ये झालेल्या ८७७ कोटी रुपयांच्या निधीची चौकशी करण्यात येणार आहे. प्रशासकीय मान्यतेची चौकशी करण्यासाठी गठीत पथकाद्वारे बीडमधील मंजूर झालेल्या कामांची सद्यस्थिती, त्या कामांना दिलेली तांत्रिक मान्यता आणि कार्यारंभ आदेश तसेच प्रशासकीय मान्यता दिलेली कामे, त्याकरिता निधी वितरण याबाबत चौकशी केली जात आहे. बोगस विकासकामांबाबत कारवाईला वेग आल्याचे पाहायला मिळत आहे.

## सोलापुरात नोकरीचे आमिष दाखवून उद्योजकाकडून महिलेवर अत्याचार, १ कोटीच्या खंडणीचा आरोप


**सोलापूर/प्रतिनिधी :** संस्थेत नोकरीचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी सोलापुरातील प्रसिद्ध उद्योजकासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उद्योजक प्रदीप शिंगवीसह रेखा गुप्ता आणि शिलवंती बिराजदार अशी त्यांची नावे आहेत. तर या प्रकरणतील पीडित महिलेविरोधात सुद्धा एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा नोंद नोंद करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सोलापुरातील एका संस्थेत अधिक्षक पदावर नोकरी लावतो, असे म्हणत आरोपी प्रदीप शिंघवी याने अत्याचार केला. तर संस्थेतल्या दोन महिलांनी पीडितेस धार्मिक कारणावरून हीन वागणूक दिल्याचा पीडित महिलेने आरोप केला आहे. मूळची मुंबईची असलेल्या या पीडित महिलेच्या तक्रारीवरून तिघांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ६९ आणि ॲट्रॉसिटी कायद्याच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# देवेंद्र फडणवीस अन् अजित पवारांची जवळीक वाढली, दोन महिन्यांत राजकारणात मोठे बदल होणार : अंजली दमानिया

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील जवळीक वाढत चालली आहे. अजितदादांना जवळ करुन देवेंद्र फडणवीस आता एकनाथ शिंदे यांना दूर लोटू शकतात. ही देवेंद्र फडणवीस यांची विचारपूर्वक आखलेली रणनीती दिसत आहे, असे वक्तव्य सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. यावेळी अंजली दमानिया यांनी येत्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राजकीय भूकंप होण्याचे संकेत दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असून येत्या दोन महिन्यांमध्ये



राज्यातील राजकारणात मोठे बदल होणार आहेत, असा दावा अंजली दमानिया यांनी केला.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना काही योजना सुरु केल्या होत्या. त्या योजना आता देवेंद्र फडणवीस यांच्याकडून एक-एक करुन बंद केल्या जात आहेत. हा एकनाथ शिंदे यांना बाजूला सारण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे, असे अंजली दमानिया यांनी म्हटले. याउलट सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांवर गंभीर आरोप होऊनही पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्याविरोधात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना अनेक पुरावे दिले आहेत. संतोष देशमुखांच्या हत्येमागील बडा नेता कोण? हे अजून मुख्यमंत्र्यांना कळालेले नाही का? धनंजय मुंडे हे मंत्रिपदावर असेपर्यंत देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासावर त्यांचा दबाव राहील. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांचा राजीनामा कधी घेणार, असा सवाल अंजली दमानिया यांनी उपस्थित केला.

राज्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीमधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुरुवातीला वगळण्यात आले होते. राज्याचा मुख्यमंत्री या समितीचा अध्यक्ष असतो. त्यानुसार देवेंद्र फडणवीस यांच्या हातात या समितीची सूत्रं आली आहेत. त्यांनी या सामितीमध्ये अजित पवार यांचा समावेश केला होता. मात्र, एकनाथ शिंदे यांना समितीमध्ये स्थान देण्यात आले नव्हते. यावरुन शिंदे गटात तीव्र पडसाद उमटले होते. त्यामुळे मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नियमांत बदल करून एकनाथ शिंदे यांना आपत्ती व्यवस्थापन समिती समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांची लोकप्रियता कमालीची वाढती होती. यामध्ये त्यांची जनसामान्यांमध्ये मिसळून काम करण्याची पद्धत आणि लोकप्रिय घोषणांचा धडाका या दोन गोष्टींचा महत्त्वाचा वाटा होता. सामान्य जनतेच्या दैनंदिन आयुष्यावर प्रभाव टाकतील आणि त्यांना थेट भावतील, अशा योजना एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून सुरु केल्या होत्या. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाचा कारभार हाती घेतल्यानंतर राज्याला आर्थिक शिस्त लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना बंद करण्याचा निर्णय फडणवीसांनी घेतला. तसेच 'आनंदाचा शिधा' आणि 'शिवभोजन थाळी' या दोन लोकप्रिय योजनाही बंद करण्याबाबत राज्य सरकारचा विचार सुरु आहे. या सगळ्या योजना एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुरु करण्यात आल्या होत्या.

CMYK

## कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान असून दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले. मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला मात्र विद्यार्थी पंतप्रधानांचा हा संदेश कितपत अंमलात आणतील याबाबत शंकाच आहे कारण कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहावी बारावीच्या परीक्षेत तर कॉपीचा सुळसुळाट झालेला दिसून येतो. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉल च्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करतात हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

# फार्मर आयडी शेतकऱ्यांची नवी ओळख - तहसीलदार निलेश मडके

## डोणगाव येथे फार्मर आयडी व विविध प्रमाणपत्रांचे वाटप





दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या महत्वकांक्षी ॲग्रीस्टॅक योजनेद्वारे शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण एकदाच करून त्यांचा संपूर्ण डेटा डिजिटल स्वरूपात सुरक्षित केला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात वारंवार ईकेवायसी करण्याची गरज राहणार नाही आणि योजनांचा लाभ त्वरित मिळेल.शेतकऱ्यांना पिक विमा, पिक कर्ज, पीएम किसान योजना, विविध पिक अनुदाने आणि कृषी विषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक राहणार आहे. फार्मर आयडीने शेतकऱ्यांची नवी ओळख निर्माण होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करून घ्यावी, असे आवाहन मेहकरचे तहसीलदार निलेश मडके यांनी केले आहे. शेतकऱ्यांना फार्मर आयडी व विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी महसूल, वनविभाग व मेहकर तहसील कार्यालयाच्या वतीने डोणगाव येथे १२ फेब्रुवारी रोजी आयोजित ॲग्रीस्टॅक शिबिरात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप विभागीय अधिकारी रविंद्र जोगी होते. तर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार निलेश मडके, प्रमुख अतिथी म्हणून माजी सभापती राजेंद्र पळसकर, भास्करराव काळे, दिलीप देशमुख, शैलेश सावजी, गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे, अर्जुनराव वानखेडे, नाजीमभाई कुरेशी, सरपंच शिवचरण आखाडे, प्रगतशील शेतकरी सुरेशपंत बाजड, विजयराव जाधव, पंजाबराव मेटांगळे,सरपंच सौ. वर्षा काळे,ग्रामविकास अधिकारी दिपक ताबारे,सौ ज्योती बुरखंडे,सौ. महेफुजा सैय्यद सह डोणगांव मंडळातील सरपंच, उपसरपंच,ग्रा प सदस्य अनेक मान्यवर उपस्थित होते, दिपप्रज्वलन,थोर पुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आयोजकांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले, प्रास्ताविक मनोगतातून तलाठी पल्लवी गुट्ठेवार यांनी शिबिर आयोजन मागील भूमिका व माहिती स्पष्ट केली.सदर शिबिरात उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके यांच्याहस्ते व ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्यासह अधिकारी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत शेकडो शेतकऱ्यांना फार्मर आयडी व विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. डोणगाव मंडळाचा महसूल पंधरवाडा कार्यक्रमातंर्गत परिसरातील नागरिकांना व शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक योजना, मोफत सातबारा वितरण, पीएम किसान योजना, संजय गांधी श्रावणबाळ योजना, सेतू केंद्रातील दाखले वितरण, आयुष्मान भारत योजना, कृषी विभाग,आरोग्य विभाग, ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजना यांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तलाठी कार्यालय डोणगाव येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.अग्रिस्टॅक योजनेच्या माध्यमातून शेतकरी माहिती संच आणि शेतकरी ओळख क्रमांक फार्मर तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा जलद आणि प्रभावी लाभ मिळावा, यासाठी डिजिटल सेवांचा उपयोग करून अग्रिस्टॅक प्रणालीद्वारे शेतकरी नोंदणी केली जात आहे. अग्रिस्टॅक प्रणालीमध्ये लागवडी योग्य क्षेत्राचीच नोंद केली जाते, परंतु शेतकऱ्यांनी जर पोटखराब जमिनीत लागवड सुरू केली असेल, तर ती जमीन देखील अग्रिस्टॅक प्रणालीत समाविष्ट होऊ शकते. यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी तलाठी किंवा मंडळ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. आणि अग्रिस्टॅक योजनेतंर्गत फार्मर आयडी काढून घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके यांनी केले आहे. तसेच शिबिरामध्ये शेतकऱ्यांनी आपल्या अनेक तक्रारी मांडले आहेत. या तक्रारीचे निवारण सुद्धा सायंकाळी पाच वाजेपर्यंत करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिले असल्याची माहिती तहसीलदार यांनी दिली आहे. तसेच संपूर्ण महसूल मंडळा अंतर्गत असे कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती महसूल विभागाच्या वतीने तहसीलदार यांनी दिली आहे.या शिबिराला महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व विविध योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेतकऱ्यांनी व्यक्त केले समाधान

मेहकर तहसील कार्यालयाच्या वतीने डोगणाव येथील तलाठी कार्यालय येथे महसूल पंधरवाडानिमित्त १२ फेब्रुवारी रोजी आयोजित शिबिरात ॲग्रीस्टक योजनेतंर्गत फार्मर आयडी व विविध दाखल्याचे वाटप करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मेहकर तहसील कार्यालय येथे जाण्याचा वेळ व खर्चाची बचत झाली आहे. तसेच कोणताही त्रास न होता गावातच दाखले मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### डोणगाव मंडळात १९८७ ॲग्रीस्टॅक आयडी ओपन : तलाठी अमोल राठोड यांची माहिती

**मेहकर :** मेहकर तहसील कार्यालयाच्या वतीने शिबिराचे आयोजन डोणगाव येथे शेतकऱ्यांना फार्मर आयडी व विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत डोणगाव परिसरातील तब्बल १९८७ शेतकऱ्यांच्या ॲग्रीस्टॅक आयडी तयार करण्यात आल्या आहेत. अडीचशे ते तीनशे शेतकऱ्यांना सातबारा वाटप करण्यात आले आहेत. ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रकारचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. ही आयडी तयार केल्यानंतर शेतकऱ्यांना वेगळा सातबारा लावण्याची गरज नाही. एकाच आयडीवर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची मदत मिळणार आहे. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनेचा लाभही शेतकऱ्यांना याच आयडीवर घेता येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत बनवलेले आयडी हे एकदम सोयीचे व सुरक्षित राहणार आहेत. अशी माहिती डोणगाव येथील तलाठी अमोल राठोड यांनी दिली आहे.

# 'तुम्ही फिल्म इंडस्ट्रीला मारून टाकताय', संसदेत जया बच्चन भडकल्या

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री आणि समाजवादी पक्षाच्या राज्यसभा सदस्या जया बच्चन त्यांच्या तीक्ष्ण टिप्पण्यांमुळे सोशल मीडियावर अनेकदा चर्चेचा विषय बनतात. राज्यसभेतही आपले विचार स्पष्टपणे मांडणाऱ्या जया बच्चन यांनी २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चे दरम्यान राज्यसभेत बॉलिवूडबद्दल भाष्य केले. त्यांनी आरोप केला की चित्रपटांना लक्ष्य केले जात आहे आणि सरकारने चित्रपट उद्योगाप्रती 'दया' करावी असे आवाहन केले.

जया बच्चन म्हणाल्या, तुम्ही एका उद्योगाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे आणि इतर सरकारेही तेच करत होती.' पण आज तुम्ही ते पुढच्या पातळीवर नेले आहे. तुम्ही चित्रपट आणि मनोरंजन उद्योगाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे कारण तुम्ही त्यांचा वापर फक्त तुमच्या स्वतःच्या उद्देशासाठी करता.

संपूर्ण जगाला भारताशी जोडणारा एकमेव उद्योग

अभिनेत्री पुढे म्हणाली, 'आज, जीएसटी वगळता, सर्व सिंगल स्क्रीन (थिएटर) बंद होत आहेत. सर्व काही महाग झाल्यामुळे लोक चित्रपटगृहात जात नाहीत. कदाचित तुम्हाला हा उद्योग पूर्णपणे बंद करायचा असेल. हा एकमेव उद्योग आहे जो संपूर्ण जगाला भारताशी जोडतो.

त्यांनी सरकारला उद्योग 'नष्ट' करू नये असे आवाहनही केले. जया बच्चन म्हणाल्या की, मी माझ्या चित्रपट उद्योगाच्या वतीने आणि दृकश्राव्य उद्योगाच्या वतीने बोलत आहे. मी या सभागृहाला विनंती करत आहे की कृपया त्यांना सोडून द्या. कृपया त्यांच्याबद्दल थोडी दया दाखवा. तुम्ही या उद्योगाला नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहात. कृपया असं करू नका आज तुम्ही सिनेमालाही लक्ष्य करायला सुरुवात केली आहे.' त्यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना या मुद्द्यावर 'खूप गांभीर्याने' विचार करण्यास सांगितले आहे.

गेल्या वर्षी अर्थ मंत्रालयाने स्पष्ट केले होते की, सिनेमागृहात उघडपणे विकल्या जाणाऱ्या पॉपकॉर्नवर रेस्टॉरंट सेवांप्रमाणेच ५ टक्के जीएसटी दराने कर आकारला जाईल. तथापि, जर पॉपकॉर्न चित्रपटाच्या तिकिटासह जोडलेला असेल तर तो एक मानला जाईल. अशा प्रकरणांमध्ये, लागू कर दर मुख्य वस्तूवर, म्हणजेच चित्रपट तिकीटावर आधारित असेल आणि त्यावर १२ ते १८ टक्के जीएसटी लागू शकतो.

## मोर्शीचे तहसीलदार राहुल पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई; खासदार अनिल बोंडेंच्या तक्रारीवरुन कारवाईचा बडगा

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीच्या मोर्शीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. मोर्शीचे तहसीलदार राहुल पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महसूल विभागाची प्रतिमा मलिन केल्याचा राहुल पाटील यांच्यावर ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली आहे. तर या संदर्भात भाजप खासदार अनिल बोंडे यांनी तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत ही कारवाई करण्यात आली आहे.

खासदार अनिल बोंडेंच्या तक्रारीवरुन कारवाईचा बडगा

मिळालेल्या माहितीनुसार, तहसीलदार राहुल पाटील विरुद्ध जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी शासनाकडे अहवाल सादर केला होता. यात आपत्ती व्यवस्थापन, निवडणूक कामकाज, गौण खनिजाच्या कामात अनियमितता केल्याची पाटील यांच्याविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रारीवरुन राहुल पाटील यांच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारत ही कारवाई करण्यात आली आहे. शिवाय तहसीलदार राहुल पाटील यांची आता विभागीय चौकशीही होणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

नेमकं प्रकरण काय?

अमरावतीच्या मोर्शीचे तहसिलदार राहूल पाटील आपल्या पदावर कार्यरत असताना निवडणूक विषयक कामकाज करताना, नैसर्गीक आपत्ती, गौणखनिज उत्खनन-वाहतूक व शासनाच्या प्राधान्य क्रमातील विषयात अक्षम्य दिरंगाई केल्याचं राज्यपाल यांच्या आदेशात म्हटले आहे. तसेच कार्यालयीन शिस्त पाळत नसल्याचे, तसेच बेजबाबदार कारभारामुळे महसूल विभागाची व शासनाची प्रतिमा जनमानसात मलीन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन केले असल्याने राहुल पाटील यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदी अन्वये विभागीय चौकशीची कारवाई करण्याच्या अधिनतेने राहूल पाटील यांना निलंबित करणे आवश्यक असल्याचे ही त्यात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, आदेश अंमलात असेपर्यत राहूल पाटील यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे असेल व त्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्या पूर्व संमत्तीशिवाय मुख्यालय सोडता कामा नये. तसेच निलंबनाच्या कालावधीत तहसिलदार राहूल पाटील यांनी खाजगी नोकरी स्वीकारू नये किंवा धंदा वा व्यापार करू नये. त्यांनी तसे केल्यास ते दोषारोपास पात्र ठरतील व त्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. शिवाय निलंबन निर्वाह भत्ता गमाविण्यास पात्र ठरतील. असेही या शासन आदेशात म्हटले आहे.

# संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती उत्सहात साजरी

दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** आज १२ फेब्रुवारी संत शिरोमणी गुरुदेव श्री रविदास महाराज यांचा जन्म १४ व्या शतकातला. आज त्यांची ६४८ वी जयंती आहे. गुरु रविदास जयंती ही पूर्ण भारतात संत रविदास यांची जयंती माघ पौर्णिमेच्या दिवशी साजरी केली जाते. रविदास यांचा जन्म उत्तर प्रदेशातील सीर गोवर्धनपूर गावातील एका वंचित कुटुंबात झाला.

मानवी हक्कांचे समर्थक असलेले रविदास हे एक प्रगतीशील विचारवंत होते ज्यांनी त्यांच्या कविता आणि अध्यात्मावर आधारित शिकवणींद्वारे त्यांनी समाजासाठी ऐसा चाहूं राज मैं, जहां मिलै सब को अन्न। छोट-बड़ो सब सम बसै, रैदास रहै प्रसन्न।।



समानतेचा संदेश दिला.समाजाच्या बऱ्याच मोठ्या घटकावर जातीच्या नावाखाली हजारो वर्षे अन्याय झाला. अशा सर्व समाजांच्या उद्धारासाठी संत रविदास महाराजांनी काम केले. त्यांना स्वतःलादेखील या अन्यायाविरुद्ध संघर्ष करावा लागला. भारतीय इतिहास आणि साहित्यात संत रविदासांचे महत्वाचे स्थान आहे. त्यांनी शोषित-पीडित-वंचित-दलित जनतेच्या आकांक्षांना आपल्या रचनांमधून अभिव्यक्त केले. सामाजिक न्याय, सामाजिक समता आणि सर्वधर्म समभाव त्यांच्या वाणीचा मूळ स्वर आहे. एक प्रसिद्ध कवी, त्यांच्या कविता शीख धर्मग्रंथ गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. हिंदू अध्यात्मवादाच्या क्षेत्रातील एक प्रमुख व्यक्तिमत्व असलेल्या मीराबाई, गुरु रविदासांना आपले आध्यात्मिक मार्गदर्शक मानत असत. रविदासांना २१ व्या शतकातील रविदासीय धर्माचे संस्थापक मानले जाते.

आज या महान संत रोहिदास महाराज शिरोमणी यांची जयंती ढाणकीतील सर्व चर्मकार बांधवानी संत रोहिदास महाराज शिरोमणी यांच्या प्रतिमेवर हार घालून व पेढे वाटून साजरी केली. यावेळी बिटरगाव पोलीस स्टेशन चे उपनिरीक्षक शिवाजी टिपूर्णे, बाळू पाटील चंद्रे, ओमा पाटील चंद्रे, साहेबराव वाघमोडे, रमेश गायकवाड ,गजानन सुरोशे,बालाजी पाचकोरे, प्रभाकर वाघमारे, संजय परतूडे दत्ता कांबळे, बालाजी परतूडे,पत्रकार करण भरणे, महेबूब शेख, अशोक गायकवाड आणि सर्व ढाणकी चर्मकार बांधव उपस्थित होते.

## संत रविदास महाराज जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**बुलडाणा/प्रतिनिधी :** संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी अजिक्य गोडगे व समाधान गायकवाड यांनी संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# बुलढाणा जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना गतीने पूर्ण करा

## पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे आदेश

## ‘आपला विदर्भ’च्या वृत्ताची दखल

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर, लोणार तालुक्यातील जलजीवन योजनेच्या १३८ गावांमधील कामे त्वरित पूर्ण करावी, यासाठी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार ११ फेब्रुवारी रोजी मंत्रालयातील पाणी पुरवठा मंत्री पाटील यांच्या दालनात अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी मेहकर, लोणार तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांसोबतच बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण कराव्यात असे आदेश मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

मेहकर विधानसभा मतदारसंघातील मेहकर तालुक्यातील १३२ कोटी ५७ लाख रुपये खर्चून ९२ गावांमध्ये तर लोणार तालुक्यातील ४६ गावांमध्ये ६६ कोटी ८० लाख रुपये खर्चाच्या जलजीवन मिशन योजनेची कामे अतिशय संथगतीने सुरू आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून ७५ कोटी ८८ लाख खर्चाच्या चार प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आणि लोणार तालुक्यात २४ कोटी ५२ लाख रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा योजनांची कामे अतिशय मंद गतीने सुरू आहेत.





**मेहकर व लोणार तालुक्यातील जल जीवन मिशनच्या कामासंदर्भात दैनिक आपला विदर्भने वृत्त मालिका चालवून सदर योजनेतील गौडबंगाल चव्हाट्यावर आणले होते. त्यानंतर दैनिक आपला विदर्भाच्या वृत्ताची दखल घेत पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी बैठक घेत सदर कामे तात्काळ करण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्यानंतरही कोणत्याही प्रकारचे सुधारणा सदर कामात झाली नाही. त्यानंतर गेल्या १० दिवसांपासून दैनिक आपला विदर्भने जलजीवन मिशन योजनेत झालेल्या प्रचंड भ्रष्टाचाराबाबत वृत्तमालिका चालवत सदर प्रकरणाला वाचा फोडली आहे. या वृत्ताची दखल घेत पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी संबंधित काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश यंत्रणेला दिले आहेत.मात्र, अधिकारी मंत्र्यांच्या निर्देशाला किती गांभीर्याने घेतात याकडे जनतेचे लक्ष लागले.**

ही कामे जलद गतीने पूर्ण करण्यात यावीत,अशी मागणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे केली होती. त्यानुसार ११ फेब्रुवारी रोजी रोजी मंत्री गुलाबराव पाटील यांच्या दालनात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती बैठकीला संजय रायमुलकर यांच्यासह संबंधित खात्याचे सचिव ,उपसचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.जलजीवन मिशनच्या कामांना सात सप्टेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश सर्व कंत्राटदारांना देण्यात आला होता. १४ ऑक्टोबर २०२४ पूर्वी ही सर्व कामे पूर्ण होणे नियमानुसार आवश्यक होते. परंतु अद्याप बहुतांश कामे अर्धवट स्थितीत आहेत, याबद्दल संजय रायमुलकर यांनी बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. मेहकर ,लोणार तालुक्यातील व बुलढाणा जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा मंत्र्यांनी आढावा घेतला. बुलढाणा जिल्ह्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आणि जलजीवन मिशनच्या योजनांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यात यावीत, असे आदेश गुलाबराव पाटील यांनी दिले. ज्या कंत्राटदारांची कामे मोठ्या प्रमाणात अपूर्ण आहेत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

## संक्षिप्त...

### छत्रपती संभाजी नगर रेल्वे स्टेशन येथे गस्तीवर असलेल्या रेल्वे पोलिसांनी वाचवले महिलेचे प्राण




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आज दिनांक १२ /०२/२५ रोजी सकाळच्या सुमारास रेल्वे स्टेशन छत्रपती संभाजीनगर येथे लोहमार्ग पोलिसांची नियमित गस्त चालू होती. गाडी क्रमांक १२०७२ जनशताब्दी एक्सप्रेस मुंबईकडे जात असताना आपल्या हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुलाला बानोबी शेख रशीद या सोडण्यासाठी आल्या व अचानक गाडी चालू झाल्यानंतर त्या गाडीमध्येच राहिल्या व गडबडीत उतरण्याचा प्रयत्न करत असताना तोल जाऊन खाली पडल्या. त्याचवेळी गस्तीवर असलेले पोलीस अमलदार ज्ञानेश्र्वर शिरसागर व अश्रुबा गेजगे यांचे लक्ष गेल्याने त्यांनी लागलीच धाव घेऊन महिलेला ट्रेन खाली जात असताना तात्काळ बाहेर खेचल्यामुळे महिलेला दुखापत झाली नाही. त्यानंतर महिलेला सुरक्षित यांचे नातेवाईकाचे ताब्यात देण्यात आले. त्याकरता त्यांचे कामगिरी चे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. त्यांचे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पो. नि. शरद जोगदंड व स. पो.नि.गणेश दळवी यांनी पोलीस ठाण्यात अभिनंदन केले.

### सगळ्या माफियांचा आका मनोज जरांगे - नवनाथ वाघमारे



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** सगळ्या माफियांचा आका मनोज जरांगे आहे, असा आरोप ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी केला आहे. जरांगेंच्या मागे आता यापुढे साडेसाती लागली असून, पापाचा घडा भरल्यानं आता जरंगेंना जेलमध्ये जावं लागणार असल्याचा टोलाही वाघमारे यांनी जरांगे यांना लगावला आहे. जरांगेंना फिरायला वाळू माफियांच्याच गाड्या होत्या. या वाळू माफियांवर कारवाई करून सरकारकडून जरांगेंच्या मुसक्या आवळण्याचं काम सुरु असल्याचं वाघमारे म्हणालेत. साखळी उपोषण हे बोगस उपोषण असते. लोक जेवण करून या उपोषणात बसतात. दम असेल तर जरांगेंनं पुन्हा आमरण उपोषण करावं, असं आव्हान वाघमारे यांनी जरांगे यांना दिलं. जरांगे यांच्या सुरु होणाऱ्या उपोषणाकडे प्रशासन उपोषणाकडे दुर्लक्ष करणार असून, स्वतःच्या मेहुण्याला वाचवण्यासाठी जरांगेंचं उपोषण आयोजित केल्याचा आरोप वाघमारे यांनी केला.

### एका बॉक्सर पासून हाय फाय चोर बनलेल्या चोराला आता बेंगलोर पोलिसांनी केले गजाआड



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** पोलिसांच्या रेकॉर्डवर ‘बॉक्सर’,‘जेम्स’ या नावाने वावरणारा अट्टल चोर पंचाक्षरी संगय्या स्वामी रेल्वे परिसर, लिमयेवाडी सोलापूर चा मूळ रहिवासी तो पट्टीचा बॉक्सर खेळाडू. काही वर्षापूर्वी तो चोरीच्या गुन्ह्यात आला. सोलापुरात काही चोर्या करून थेट हैदराबाद गाठले. तिथेही वीस-पंचवीस चोर्या केल्या आहेत. तिथून त्याने मुंबई गाठली. चेंबूर परिसरात त्याने तीस-चाळीस घरफोड्या, चोर्या केल्या पुणे पोलिसांच्या रेकॉर्डवरही त्याच्या नावे चोरीचे गुन्हे आहेत.चोरी करण्यासाठी तो मुंबईहून विमानाने हैदराबादला जायचा.

### सुदर्शन घुलेला तारीख पे तारीख! पुन्हा पोलीस कोठडीत धाडले

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपी असलेल्या सुदर्शन घुले याला न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सीआयडीने सुदर्शन घुले याची पाच दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने केवळ दोन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. त्यामुळे आता १४ फेब्रुवारीला सुदर्शन घुले याला पुन्हा एकदा न्यायालयात हजर केले जाईल. खंडणी प्रकरणात आरोपी सुदर्शन घुले याला केज न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्याच्यावर आवादा एनर्जी पवनचक्की प्रकल्प चालकाकडून दोन कोटींची खंडणी मागितल्याचा आणि संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात सहभागी असल्याचा गुन्हा दाखल आहे.

# पदयात्रेद्वारे ग्रामस्वच्छतेचा संदेश

## शिवशंभुभक्तांकडून पदयात्रेचे डोणगाव येथे स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** ग्राम स्वच्छता, किसान बचाव, देश बचाओ, पेड लगाओ जान बचाओ, स्वस्त रहो मस्त रहो आदीबाबत प्रकाश गुरुदयाळ ठाकरे यांनी नागपूर ते मुंबई पर्यंत पदयात्रा काढून जनजागृती सुरू केली आहे. सदर पदयात्रा डोणगाव येथे आली असता विविध मान्यवर व युवकांच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला आहे.

नागपूर येथील प्रकाश ठाकरे यांनी संपूर्ण देशात सुख-समृद्धी यावी, व्यापारी, कर्मचारी, शेतकरी, जवान यांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी, ग्रामपंचायत स्वच्छ व सुंदर व्हावी,संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ व निरोगी राहावा एक शक्तिशाली देश बनावा, यासाठी नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गुरुदयाल ठाकरे यांनी नागपूर ते मुंबई पर्यंत पदयात्रा काढून जनजागृती करण्याचे काम सुरू केले आहे. चक्रवती राजा भोज पवार समाज संघटन समिती वांजरा कळमना उत्तर नागपूर येथून सुरू केलेली ही पदयात्रा मुंबई येथे उपमुख्यमंत्री यांच्या निवासस्थानापर्यंत नेण्यात येणार आहे.या पदयात्रेदरम्यान विविध संदर्भात जनजागृती करण्याचे काम प्रकाश ठाकरे करीत आहेत. सदर पदयात्रा ही मार्गक्रमण करत डोणगाव येथे आली असता येथील पळसकर यांच्या रोपवाटिकेत पंकज पळसकर, चेतन आखाडे, सह युवकांनी तसेच विविध मान्यवरांच्या वतीने प्रकाश ठाकरे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच या पदयात्रे संदर्भात त्यांच्यासोबत संवाद साधन माहिती जाणून घेतली. यावेळी प्रकाश ठाकरे यांनी सदर पद यात्रा ही आपण देशात सुख-समृद्धी नांदावी, देश स्वच्छ व सुंदर व्हावा, निरोगी राहावा, बलशाली व्हावा या संदर्भात जनजागृती करण्याचे काम करीत असल्याचे मत व्यक्त केले. त्याचबरोबर या जनजागृतीतून नागरिकांमध्ये नक्कीच परिवर्तन होईल व देश बलशाली बनण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा मोठा हातभार लागेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

# संत रविदास महाराज यांचे विचार आजही प्रेरणादायी : आमदार सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार २०२१ पासुन संत रविदास महाराज यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी करण्यात येत आहे.यानिमित्त मंत्रालयात संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून आमदार सिद्धार्थ खरात यांनी संत रविदास महाराज यांना अभिवादन केले.संत रविदास महाराजांनी भजन, कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजातील चुकीच्या अनिष्ट प्रथा, परंपरांवर प्रहार केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही संत रविदास महाराज यांच्या विचारांचा मोठा प्रभाव राहिलेला आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपला ‘दी अनटचेबल’ हा ग्रंथही संत रविदास महाराज यांनाच समर्पित केला आहे म्हणून त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी व्यक्त केले. पुढे बोलतांना आमदार खरात म्हणाले की संत रविदास महाराजांचे विचार आजही अनुकरणीय व प्रेरणादायी आहे. संत रविदास महाराज यांचा जन्म १४ व्या शतकात झाला.आज दि .१२ फेब्रुवारी २०२५ रोजी तिथी नुसार त्यांची ६४८ वी जयंती आहे. त्यांनी सर्व समाजांच्या उद्धारासाठी प्रबोधनाचे कार्य केले. त्यांना स्वतःला देखील अन्यायाविरुद्ध संघर्ष करावा लागला. भारतीय इतिहास आणि साहित्यात संत रविदासांचे महत्वाचे स्थान आहे. त्यांनी शोषित-पीडित-वंचित-दलित जनतेच्या आकांक्षांना आपल्या रचनांमधून अभिव्यक्त केले. सामाजिक न्याय, सामाजिक समता आणि सर्वधर्म समभाव त्यांच्या वाणीचा मूळ स्वर आहे. त्यामुळे आजच्या काळात त्यांचे महान कार्य समजून घेणे खूप महत्वाचे असल्याचेही आमदार सिद्धार्थ खरात या वेळी म्हणाले.



# करंजी ग्राम चे फिल्टर प्लांट बनले शोभेची वस्तू, नागरिकांना पिवावे लागते दूषित पाणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** गावकऱ्यांना पिण्याचे पाणी सुध्द मिळावे यासाठी शासनाने करंजी ग्राम पंचायत अंतर्गत लाखो रू निधी देवून पाण्याचे टाके व फिल्टर प्लांट गावात उभा केला.मात्र गेल्या चार वर्षापासून फिल्टर प्लांट धुळखात पडला आहे.त्यामुळे गावकऱ्यांना दूषित पाण्यावरच आपली तहाण भागवत असल्याने, दूषित पाणी पिल्याने कॉलरा, अतिसार, आमांश, हिपॅटायटीस ए, टायफॉइड, पोलिओ, विषमज्वर, कावीळ, गॅस्ट्रो, साल्मोनेला टायफी वगैरे आजार होण्याची शक्यता बळावल्याने नागरिक भय -भीत असल्याचे बोलल्या जात आहे. केंद्रशासनाकडून जलजिवन मिशन अंतर्गत घरोघरी नळाव्दारे पाणी शासवत असून करंजी ग्राम मध्ये ४३ लाखाची खणीकर्म विकास निधी अंतर्गत पाण्याचे टाके व पाणी पुरवठा सार्वजनीक वीहीर खोदकाम बांधकाम करून जलवितरण व्यवस्था सुध्दा पूर्ण झाली मात्र गेल्या ४ वर्षापासून पाण्याचे टाके पाणी साठवण्यासाठी तात्काळत उभे आहे.२०१५ ते २०२० पंचवार्षीक मधील सरपंच व सदस्यांनी एवढे मोठे निधी खर्च करून गावाला शुध्द व मुबलक पाणी देण्यासाठी तयार केलेली पाणी पुरवठा योजना हल्लीच्या ग्राम पंचायतच्या नाकार्तेपणामुळे ठप्प पडली आहे.पंधरावा वित्त आयोगाच्या निधी मधून निधी खर्च करून फिल्टर प्लांट बसविण्यात आला तेंव्हा गावऱ्यांना वाटले आता आमचे दूषित पाणी पिवून जगण्याचे दिवस संपणार मात्र त्यांची घोर निराशा झाली.फिल्टर प्लांटला कुलूप लावण्यात आले असून शुध्द नाही तरी चालेल पण अशुध्द पाणी पुरवठा तरी करा अशी ओरड ग्रामस्थांकडून सुरू आहे.मागील आठ दिवसांपासून पाणी पुरवठा करणारी विहीरवरील विदयूत मोटार बंद आहे.त्यामुळे गावकरींना पिण्याच्या पाण्यासाठी कोसो दूर पायपिठ करून पाणी भरावे लागत आहे.

गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी दोन सार्वजनिक विहरी उपलब्ध आहेत. एका विहरीवर लघु पाणी पुरवठयासाठी लघु पाईपलाईन अथरून टाकूण आहेत.मात्र आठ दिवसांपासून मोटार नादुरूस्त ना झाल्याच्या नावाखाली गावकरींच्या घषाला कोरड लागली आहे.



**सार्वजनिक पाणी पुरवठा विहरीला मुबलक पाणी नसल्यामुळे तसेच खणीकर्म विकास निधी मधून मंजूर झालेल्या पाणी पुरवठा विहरीला वितरण व्यवस्थेत बिघाड असल्यामुळे फिल्टर प्लांट मध्ये पाणी शुध्दीकरणाचे कार्य बंद आहे.नव्याने जिल्हा परीषद शाळेच्या आवारात २०० फूट खोली बोअर मारलेला आहे.त्याला पाणी सुध्दा मुबलक आहे.त्या बोअर मधुन पाणी फिल्टरमध्ये साठवून आठ दिवसाच्या आत गावाला शुध्द पाण्याचा पुरवठा पाणी फिल्टर प्लांट मधून सुरळीत सुरू ठेवण्यात येणार आहे.**

**-शेख फरीद**

**ग्रामसेवक,ग्राम पंचायत कार्यालय करंजी**

# अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जलजीवन मिशनच्या चौकशीचे काम थंडबस्त्यात

## ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आला निकृष्ट कामाचा आरोप

## अंजनी बु. येथील प्रकार : वरिष्ठ अधिकाऱ्याने दाखवला ग्रामसभेच्या ठरावाला ठेंगा




ग्रामस्थांच्या तक्रारीला अधिकाऱ्याची केराची टोपली

ग्रामस्थांमध्ये प्रशासनाप्रती तीव्र रोष

भाग ८

दैनिक आपला विदर्भ

मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक हे येथील पाणीटंचाई निवारण्यासाठी शासनाने दोन वर्षांपूर्वी जल जीवन मिशन अंतर्गत तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी खर्च करून कामास प्रारंभ केला होता. मात्र, सदर काम हे अद्यापही पूर्ण झाले नाही. त्यामुळे अंजनी बुद्रुक वाशी यांना पाणीटंचाईच्या भीषण समस्येला सामोरे जावे लागत आहे.कोट्यावधीचा निधी खर्च करून काम अपूर्ण राहिले असल्याने ग्रामस्थांना पाणी टचाईचे चटके सोसावे लागत आहेत. याकडे आपण लक्ष देऊन येथील पाणीटंचाई निवारण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी अंजनी बु. येथील ग्राम पंचायतच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदनाला एक वर्षाचा कालावधी होत असतानाही अधिकाऱ्यांनी या निवेदनाची दखल न घेतल्याने ग्रामस्थांमध्ये प्रशासनाप्रति तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

अंजनी बुद्रुक. हे पाच हजार लोकसंख्येचे वर गाव असुन सदर गावात जल-जीवन मिशन योजनेचे काम निकृष्ठ झाल्यामुळे याबाबत उपअभियंता, कार्यकारी अभियंता, व बुलढाणा ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मेहकर व बुलढाणा यांना वेळोवेळी तक्रारीच्या माध्यमातून कळविले आहे, परंतु, त्याची दखल घेण्यात आली नाही. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे यापूर्वी राबविण्यात आलेल्या जलस्वराज, महाजल या योजनेचा बट्ट्याबोळ झाला. तसेच काही जल-जीवन मिशनचे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विहीरीचे काम अर्धवट ठेवले आहे. पाण्याची टाकी बांधकाम अपूर्ण आहे. गावातील वितरण व्यवस्था निकृष्ट पाईप वापरुन ती अपूर्णच आहे. खोदलेले रस्त्यावर सिमेंट टाकलेले नाही. नवीन जल-जीवन मिशनच्या विहिरीस चांगले पाणी लागले असुन त्या विहीरीपासून जुन्या नळयोजनेच्या विहिरीचे अंतर दीड किलोमीटर असुन त्या विहिरीपर्यंत तात्पुरती पूरक नळयोजना केल्यास गावातील पाणीटंचाई दूर व्होण्यास मदत होणार आहे. गावातील पाणीटंचाईमुळे वाद-विवाद वाढले आहेत. पाणीटंचाईतून अनुचित प्रकार घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर ग्रामसभेतही ग्रामस्थांनी वाद घालून गोंधळ केलेला आहे.याकडे त्यामुळे याकडे संबंधित विभागाने तत्काळ लक्ष देऊन उपाययोजना कराव्या, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने गतवर्षी करण्यात आली होती. मात्र, एका वर्षानंतरही ग्रामस्थांच्या मागणीची दखल न घेता कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आली नाही.त्यामुळे अधिकारी वर्ग शासकीय निधी लाटत असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.

देविदास खनपटे
मुख्य संपादक

दैनिक आपला विदर्भ

*मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कायमस्वरूपी व्हावी, यासाठी कोट्यवधी रुपयाचा निधी खर्च करून जल जीवन मिशनच्या कामाला दोन वर्षांपूर्वी प्रारंभ करण्यात आला. मात्र, कोट्यवधी रुपयाच्या कामाला प्रारंभीपासूनच भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याने सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले. परिणामी ग्रामस्थांनी याबाबत संबंधित वरिष्ठाकडे वारंवार तक्रारी केल्या. त्याचबरोबर ग्रामसभेने ग्रामसभेत ठराव घेऊन या कामात वरिष्ठांकडे तक्रारी करून सदर कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, करण्यात येणारे कामे अंदाजपत्रकानुसार दर्जेदार करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, ग्रामसभेच्या या ठरावाला व ग्रामस्थांच्या तक्रारीला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेंगा दाखवीत दीर्घ कालावधीनंतरही अंजनी बुद्रुक येथील जलजीवन मिशनचे कामाची चौकशी थंडबस्त्यात आहे.*







देविदास खनपटे
मुख्य संपादक




अंजनी बुद्रुक जल जीवन मिशन अंतर्गत दोन वर्षांपूर्वी कामाला प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, प्रारंभी पासूनच सदर कामे निकृष्ट दर्जाचे झाले आणि याबाबत नागरिकांनी अनेक तक्रारी केल्या, ग्रामसभेने ठराव घेत बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स डोणगाव यांनी केलेल्या कामाची निकृष्ट कामाची चौकशी करावी, त्याचबरोबर रस्ता खोदकामाची परवानगी न घेता बिनभोगाटपणे रस्ते खोदून रहदारीस अडथळा केला आहे, याची चौकशी करावी, पाण्याच्या टाकीच्या कामातील साहित्य सुद्धा निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आले आहे. काम अर्धवट असताना लोकार्पण कार्यारंभ आदेश देण्यात आले ही गंभीर बाब आहे. अशा अनेक प्रकाराबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या. ग्रामसभेने ठराव घेत संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली. या अगोदर ग्रामपंचायतीने तक्रारीवरून कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. यामुळे अधिकारी व ठेकेदार यांची मिली भगत आहे का असा प्रश्र्नही गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे.ग्रामीण पाणीपुरवठा विभाग मेहकर यांना ग्रामसभेत उपस्थित राहणे बाबत पत्र देण्यात आले होते. मात्र या पत्रांलाही संबंधित अधिकाऱ्यांनी ठेंगा दाखविला आहे.गावातील सार्वजनिक रस्ते तोडफोड केल्याप्रकरणी गावातील गोरगरीब जनतेंना त्रास होत आहे. लग्नकार्य करण्यास बाधा निर्माण झाली आहे. अधिकारी व संबंधित ठेकेदारे उर्मटपणाने वागत असून निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याने सदर कामावर प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले आहे. सदर प्रकरणी ठेकेदार व संबंधित शाखा अभियंत्याची चौकशी करून कारवाई करावी याबाबत वरिष्ठांना ग्रामसभेने ठरावाद्वारे मागणी करून सुद्धा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची कोणतीही दखल घेतली नसल्याने शासकीय निधीवर अधिकारी पदाधिकारी हे मिळून डल्ला मारत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला जात आहे.सदर प्रकरणाला तब्बल दोन वर्षाच्या वर कालावधी होत असतानाही याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याने याकडे लोकप्रतिनिधीने लक्ष देऊन सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी होत आहे.

## अधिकाऱ्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह

तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील जल जीवन मिशनच्या कोट्यावधी रुपयाच्या पाणी कामांमध्ये सुरुवातीपासूनच भ्रष्टाचाराची वाळवी लागली आहे.याबाबत ग्रामस्थांनी व ग्रामसभेने ठराव घेत संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्याची चौकशी करावी, सदर काम हे अंदाजपत्रकानुसार दर्जेदार करावे, याबाबत ठराव घेऊन वरिष्ठांकडे मागणी करण्यात आली होती. मात्र सदर मागणीला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेंगा दाखविल्याने यामध्ये अधिकारी व ठेकेदार यांची मिली बघत असल्याचे दिसून येत आहे. ठेकेदारावर कारवाई करण्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष का होत आहे हा मोठा प्रश्र्न निर्माण झाला असून अधिकाऱ्यांच्या या दुर्लक्षित धोरणामुळे त्यांच्या कर्तव्यावर प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले आहे.


# कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईसाठी वाकद ग्रामस्थांचे साखळी उपोषण

दैनिक आपला विदर्भ

## जलजीवन मिशनचे काम अपूर्ण : उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता

**वाशिम/प्रतिनिधी :** जलजीवन मिशनचे काम पूर्ण करण्यात न आल्याने गावात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाखो रुपयांचा खर्च करूनही जलजीवन मिशनचे काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, या मागणीसाठी रिसोड तालुक्यातील वाकद येथील ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १० फेब्रुवारीपासून साखळी उपोषण सुरू केले आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, रिसोड तालुक्यातील वाकद येथे भीषण पाणीटंचाई निर्माण होते. या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी खर्च करून जलजीवन मिशनतंर्गत पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात येत आहे. मात्र, सदर काम करणाजया कंत्राटदाराने जलजीवन मिशनचे काम अद्यापही पूर्ण केले नाही. त्यामुळे उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.जलजीवन मिशन अंतर्गत काम करणाजया कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, यासाठी २६ जानेवारी रोजी ग्रामसभेने ठराव घेतला होता. त्यानुसार सदर कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, यासाठी १० फेब्रुवारी रोजीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. सदर निवेदनावर सरंपच, उपसरपंच, सदस्य यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रतिलिपी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात आल्या आहेत.



# जिल्ह्यातील युवक-युवतींना मोफत कौशल्य विकासाची संधी

## कौशल्य प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधा– जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियाना अंतर्गत किमान कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम सन २०२४–२५ करिता वयवर्ष १५ ते ४५ वयोगटातील उमेदवारांना विविध अभ्यासक्रमांचे मोफत कौशल्य विकास प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील इच्छुक युवक–यवुतींनी मोफत प्रशिक्षण संधीचा लाभ घेण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आले असून सदर धोरणाची अंमलबजावणी तसेच युवक–युवतींचे विविध क्षेत्रात कौशल्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील प्रशिक्षण केंद्रातून वेगवेगळ्या अभ्यासक्रमाचे मोफत प्रशिक्षण दिली जाणार आहेत. यासाठी जिल्हा व तालुकानिहाय कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रामध्ये जाऊन संपर्क साधावा.

जिल्ह्यातील कौशल्य प्रशिक्षण केंद्राची तालुकानिहाय यादी व संपर्क क्रमांक याप्रमाणे: शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलढाणा (९०११०७९३१७), एक्स्पर्ट स्किल ट्रेनिंग सेटर बुलढाणा(९६०४३६३५१७), कॉनफ्लॅय डायनामिक्स प्रा.लि. बुलढाणा(९०८२०६४१५१), श्री माऊली ट्रेनिंग सेंटर बुलढाणा(८६०५०६३३०६), नमो स्किल बुलढाणा(९८३४८५७७४७), स्किल बहुद्देशिय संस्था बुलढाणा (९४२२९४५८११), आदर्श स्किल टेक्निकलइंस्टीट्यूटदेऊळघाट(७९७२४९४५३५),स्वर्गीयदयासागरजी महाले स्किल डेवलपमेंट इंस्टीट्युट उदयनगर(९८८१२८५३९६), विदर्भ इंस्टीट्युट स्किल डेवलपमेंट चिखली (९९२१२०१८३१), रत्नप्रभा बहुउद्देशीय शिक्षण संस्था चिखली(९९२३७४७४५६६), ड्रीम इंडिया चिखली (९८३४८५७७४७), श्री श्रेयसराज विद्या प्रतिष्ठान चिखली(९०११८७२५६४), सहकार महर्षि स्व. भास्कराव शिंगणे शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खामगाव(९४२१४६८०८३), नंद स्किल डेवलपमेंट सेंटर शेगांव (९५११७९६२९९), छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था बोरखेडी मोताळा(९६०७९७२२२२), ब्रम्हा एजुटेक मोताळा(८६६८७४५५९४), पी.डी.एम. डॉ.व्ही.बी कोलते कॉलेज ऑफ इंजीनीरिंग मलकापूर(९३२६०५९५६०), ठाकरे स्किल डेवलपमेंट सेंटर नांदुरा(९८२२९५०३४४), प्रिन्स ट्रेनिंग सेंटर उंबरखेड ता. देऊळगाव राजा(८५५४८९४०७७), मानव विकास कौशल्य केंद्र देऊळगाव माही(९९७५७०४११७), राज टेक्निकल इंस्टीट्युट देऊळगाव राजा(९०२२२३३७१५), राजमाता व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर सिंदखेडराजा(७३८५७३०५१८), प्रगती ट्रेनिंग सेंटर (९५४५४०४५४३), मातोश्री स्किल ट्रेनिंग सेंटर मलकापूर पांग्रा ता.सिंदखेडराजा(९७६६४४९००६), राजीव गांधी आर्टस ड सायन्स जूनियर कॉलेज सिंदखेडराजा (८४२१०४१८१५).

# स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचू दंश, विजेचा शॉक आदी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, अन्य कोणत्याही कारणामुळे होणाऱ्या अपघातामुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतून लाभ देण्यात येतो.

अपघातामुळे मृत्यू ओढावतो किंवा काहींना अपंगत्व येते. कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाच्या उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकरी, त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी आणि वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही एका सदस्यास आई–वडील, शेतकऱ्याची पती, पत्नी, मुलगा आणि अविवाहित मुलगी यापैकी कोणत्याही एका व्यक्ती १० ते ७५ वर्षे वयोगटातील एकूण दोन जणांकरीता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना १९ एप्रिल २०२३ पासून राबविण्यात येत आहे. गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतगत सन २०२४–२५ या वर्षात जानेवारीपर्यंत १९६ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे.

योजनेच्या प्रयोजनार्थ कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले एक सदस्यांमध्ये आई–वडील, शेतकऱ्याची पती, पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यांचा समावेश ग्राह्य धरण्यात येणार आहे. कृषि गणनेनुसार निर्धारित केलेल्या वहितीधारक खातेदार शेतकरी आणि वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्यांच्या कुटुंबातील कोणताही एक सदस्य असे एकूण दोन जणांकरीता गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभ देण्यात येतो. यात अपघाताच्या बाबीमध्ये आर्थिक सहाय्यात अपघाती मृत्यू झाल्यास दोन लाख रूपये, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी झाल्यास दोन लाख रूपये, अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास दोन लाख रूपये, अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास एक लाख रूपये अनुदान देण्यात येते.



**अपघातांचा समावेश असणाऱ्या बाबी :** अपघातामध्ये रस्ता, रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरुन पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचूदंश, नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या, जनावरांचा हल्ला, चावण्यामुळे जखमी किंवा मृत्यू, बाळंतपणातील मृत्यू, दंगल, अन्य कोणताही अपघात, या अपघाताच्या बाबींचा समावेश आहे.

**अपघातांचा समावेश नसणाऱ्या बाबी:** अपघातामध्ये नैसर्गिक मृत्यू, विमा कालावधीपुर्वीचे अपंगत्व, आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे, गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करताना झालेला अपघात, अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असताना झालेला अपघात, भ्रमीष्टपणा, शरीरांतर्गत रक्तस्त्राव, मोटार शर्यतीतील अपघात, युद्ध, सैन्यातील नोकरी, जवळच्या लाभधारकाकडून खून याबाबींचा समावेश राहणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे :** या योजनेंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी अर्जासोबत सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. सहा क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, वारसदाराचे ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, निवडणूक ओळखपत्र, अपघातग्रस्ताचा वयाचा दाखला ज्यात जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, पारपत्र, निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणतेही एक कागदपत्र, प्रथम माहिती अहवाल, घटनास्थळ पंचनामा, पोलिस पाटील माहिती अहवाल, अपघाताच्या स्वरूपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे सादर करावी लागणार आहे.

अपघातग्रस्त शेतकरी, शेतकऱ्यांचे वारसदारांनी सर्व निर्धारीत कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे ३० दिवसाच्या आत सादर करावे लागणार आहे. यासाठी कृषि विभागाच्या सर्व क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी यांचे मार्गदर्शन करतील. योजनेंतर्गत वारसदाराची निवड अपघातग्रस्ताची पत्नी, अपघातग्रस्त स्त्रिचा पती, अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी, अपघातग्रस्ताची आई, अपघातग्रस्ताचा मुलगा, अपघातग्रस्ताचे वडील, अपघातग्रस्ताची सून, अन्य कायदेशीर वारसदार याप्रमाणे करण्यात येणार आहे.